वाघोली पोलीस स्टेशन पुणे शहर

**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**
**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** पुणे शहर  **P.S.(ठाणे):** वाघोली पोलीस स्टेशन

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0667  **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**26/11/2025 00:18

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार  **Date From (दिनांक पासून):** 25/11/2025

**Time Period (कालावधी):** पहर 4  **Date To ( दिनांक पर्यंत):** 25/11/2025

**Time From (वेळेपासून):** 09:28 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 12:09 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 25/11/2025  **Time (वेळ):** 23:56 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 041

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 25/11/2025 23:56 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 0.1 किमी  **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** वाघोली पोलीस ठाणे समोरील,केसनंद रोडलगत असलेल्या ,बसस्टपचे जवळील चहाचे टपरीवर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): शितल प्रशांत चौगुले

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1992

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.** (अ.क्र.) | **ID Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **ID Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | मोही ता खानापुर जि सांगली,वाघोली पोलीस स्टेशन,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | मोही ता खानापुर जि सांगली,वाघोली पोलीस स्टेशन,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-7499093606

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | परमेश्वर माणिक पाखरे | | | 1. गणेश नगर, मदर मेरी सोसायटी जवळ, आव्हाळवाडी रोड, वाघोली पुणे ,वाघोली पोलीस स्टेशन,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. ) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | भारतीय चलनातील रु.500/ | 5,000.00 |

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| | | | दराच्या एकुण 10 नोटा | |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

5,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्यादी जबाब दि.25/11/2025

मी सर्वदा विलास सावळे वय- 37 वर्षे, व्यवसाय – नोकरी, पोलीस निरीक्षक, नेमणूक- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे रा.ठी. गोविंद सदन, 316, ढोरेनगर लेन 1, जुनी सांगवी, पुणे-27 मो. 8275458733.

आज रोजी समक्ष हजर राहून फिर्याद देते की, आम्ही दि.24/11/2025 रोजी 16.40 वाजता ला.प्र.वि. पुणे कार्यालयात, हजर असताना पोलीस उप अधीक्षक श्री दयानंद गावडे यांनी आम्हाला त्यांचे कक्षात बोलावून सदर ठिकाणी हजर असलेले तक्रारदार श्रीमती शितल प्रशांत चौगुले वय 33 वर्षे, व्यवसाय- गृहिणी, रा.मु.पो.मोही, ता. खानापूर, जि.सांगली, मो.क्र.7499093606 यांची ओळख करुन दिली व त्यांची लोकसेवकाविरुध्द लाच मागणीबाबत तक्रार असून ती घेवून त्याप्रमाणे पुढील कायदेशीर कारवाई करणेबाबत आदेशित केले व सदर कारवाईकामी म.पो.ह.क्र.2008/काळे, पोशि 1966/तावरे, चालक पोहवा 330/काकडे, व त्यांचेकडील शासकीय वाहन एम एच 12 एन यु 5882 असे पथक मदतीकरता दिले. तसेच तहसिलदार हवेली व पुणे शहर या कार्यालयास पत्र व्यवहार केला असता त्यांचेकडील पंच साक्षीदार अनुक्रमे ग्राम महसुल अधिकारी श्रीमती धनश्री बाबासाहेब काळे व महसुल सेवक श्री. महेश मधुकर मुंढे अशी नावे प्राप्त झाली असून ते तुम्हाला थोडयाच वेळात येतील असे आम्हास सांगितले.

त्यानंतर आम्ही तक्रारदार श्रीमती चौगुले व सापळा पथक यांचेसह आमचे कक्षात आलो. काही वेळ वाट पाहिल्यानंतर सुमारे 18.00 वाजता वरिल नमूद दोन्ही पंच साक्षीदार आमचे कक्षात हजर झाले. आम्ही सर्वांची आपसात ओळख करून दिली व ओळख करुन घेतली. त्यानंतर आम्ही दोन्ही पंचांना तक्रारदार श्रीमती शितल प्रशांत चौगुले यांची एका लोकसेवकाविरुध्द लाचेची मागणी होत असलेबाबत तक्रार असून त्याकामी आपण पंच साक्षीदार म्हणून उपस्थित राहून काम करण्यास तयार आहात का? अशी विचारणा करता दोन्ही पंचांनी त्यास संमत्ती दिली. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांची तक्रार प्रथम तोंडी ऐकून घेतली. त्यावरून तक्रारदार, पंच साक्षीदार यांना अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालयाकडून करण्यात येणा-या पुढील पडताळणी व सापळा कार्यवाही बाबतची सविस्तर माहिती दिली. तसेच सदर कार्यवाही कामी पंच क्र.1 म्हणून श्रीमती धनश्री काळे व पंच क्र.2 म्हणून श्री महेश मुंढे काम पाहतील असे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यानंतर तक्रारदार श्रीमती चौगुले यांनी तोंडी कथन केलेली त्यांची तक्रार त्यांचे स्वहस्ताक्षरामध्ये लिहून दिली ती पुढील प्रमाणे- तक्रारदार चौगुले यांचा पती प्रशांत चौगुले हे मागील 13 वर्षापासुन त्यांना व्यवस्थित सांभाळत नसल्याने तक्रारदार चौगुले त्यांचे माहेरी मु.पो. मोही ता. खानापुर जि. सांगली येथे रहात असून त्यांनी त्यांच्या पती विरुध्द सन 2015 मध्ये पोटगी मिळण्यासाठी मा. दुसरे सह दिवाणी न्यायाधीश तथा न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग विटा यांचे कोर्टात दावा दाखल केला होता. सदर दाव्याचा निकाल तक्रारदार यांचे बाजुने होवून मा. न्यायालयाने जुन 2015 पासून दरमहा रु.5000/- हजार प्रमाणे पोटगी देण्याचे आदेश दिले होते. परंतु तक्रारदार यांचे पतीने त्याकडे दुलक्र्ष केले त्यामुळे पुर्ण रक्कम थकुन त्याची थकबाकी रु.6,65,000/- इतकी झाली. त्यामुळे ती मिळण्यासाठी तक्रारदार यांनी त्याच कोर्टात क्रिमिनल किरकोळ अर्ज क्र.159/2024 प्रमाणे पुन्हा अर्ज सादर केला असता मा. न्यायालयाने दि.03/11/2025 रोजी जप्ती व विक्री करून पोटगीची रक्कम वसूल करण्याविषयीचे "फौ.व्य.सं.50 म" अन्वयचे वॉरंट पोलीस निरीक्षक, वाघोली पोलीस ठाणे यांचे नावे जारी करून तक्रारदार यांचे पतीची जी मालमत्ता असेल ती जप्त करावी आणि अशा जप्ती पासून दि.26/11/2025 रोजी उक्त रक्कम न दिल्यास जप्त केले जंगम मालमत्ता अगर उक्त रक्कम

येण्याइतका तिचा भाग विकुन टाकावा आणि तसे न्यायालयास लेखी कळविण्याबाबत आदेशित केले आहे. तक्रारदार यांनी सदर वॉरंट बजावणी लवकर व्हावी म्हणून ते स्व:हस्ते मा. न्यायालयातुन स्वीकारून दि. 06/11/2025 रोजी वाघोली पोलीस ठाणे येथे गेल्या असता तेथील पोलीस श्री पाखरे यांनी सदर वॉरंट बजावणी करून तसा लेखी अहवाल देण्याकरीता तक्रारदार यांचेकडे रु.5,000/- लाचेची मागणी केली आहे. सदरबाबत सविस्तर वर्णन तक्रारदार यांनी दिलेल्या त्यांच्या मुळ तक्रारीमध्ये आहे. सदर तक्रार सहीनिशी दिल्यानंतर ती वाचून आम्ही व पंचांनी त्यावर सहया केल्या. त्यानुसार तक्रारदार श्रीमती चौगुले या दि.25/11/2025 रोजी सकाळी 09.00 वाजता वाघोली पोलीस ठाणे येथे लोकसेवक पोलीस पाखरे यांना भेटण्यास जाणार असल्याचे आम्हाला सांगितले. त्यावरून आम्ही सापळा पथकास व दोन्ही पंच साक्षीदार यांना दि.25/11/2025 रोजी सकाळी 08.00 वाजता ला.प्र.वि. पुणे कार्यालयात हजर राहण्याच्या सुचना दिल्या व तक्रारदार श्रीमती चौगुले या पुणे – आहिल्यानगर हायवेवरील चंदन नगर बायपास येथे थांबणार असल्याचे आम्हाला सांगितले.

त्याप्रमाणे आज दि.25/11/2025 रोजी 08.00 वाजता आम्ही, दोन्ही पंच व सापळा पथक असे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे येथे हजर होवून आम्ही सर्वजण पोहवा काकडे यांचे ताब्यातील शासकीय वाहन एमएच 12 एन यु 5882 याने सापळा कारवाईसाठी आवश्यक असणारे सर्व साहित्य घेवून अॅन्टी करप्शन ब्युरो पुणे कार्यालय येथून 08.15 वा. रवाना झालो. वाटेत चंदननगर बायपास येथून आम्ही तक्रारदार यांना घेतले त्यावेळी तक्रारदार यांनी लोकसेवकाचे फोन येवून गेल्याचे आम्हाला सांगितले त्यामुळे आम्ही सर्व पुणे-अहिल्यानगर हायवेलगत वाघोली पुर्वी सुमारे तीन-चार किमी अंतरावर डिकेथलॉनच्या विरुध्द बाजुस असलेल्या एचपी पेट्रोल पंपाचे पाठीमागील बाजुस वाहन एका बाजुस आडोशाला पार्क केले व पुढील कार्यवाही सदर शासकीय वाहनातुन करण्यात येणार असल्याचे सर्वानुमते ठरविले. त्यानंतर आम्ही सापळा पथक, तक्रारदार व पंच साक्षीदार यांना पुढील पडताळणी कार्यवाहीच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर आम्ही शासकीय व्हॉईस रेकॉर्डर व व्हिडीओ रेकॉर्डर दाखवून त्यामध्ये दोन्ही पंचासमक्ष नवीन दोन सॅनडिस्क कंपनीची 32 जी बी क्षमतेची मेमरीकार्ड घातली. त्यानंतर आमचे सुचनेवरून पोशि तावरे यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालू करून त्यामध्ये प्रथम तक्रारदार श्रीमती चौगुले त्यानंतर पंच क्र.1 श्रीमती काळे व पंच क्र.2 श्री. मुंढे यांची पडताळणी निवेदने ध्वनिमुद्रीत केली ती वेळ 09.19 वा.ची होती. तसेच आमच्या सुचनेवरून मपोहवा सुप्रिया काळे यांनी सदर ध्वनिमुद्रीत केलेल्या निवेदनाचे व्हिडीओ चित्रिकरण देखील केलेले आहे.

त्यानंतर आम्ही व्हाईस रेकॉर्डर पुन्हा चालु करुन मपोह 2008/काळे यांचे मदतीने तक्रारदार श्रीमती चौगुले यांनी परिधान केलेल्या कुर्तीच्या आतील बाजुस सेफ्टी पिनचे सहाय्याने लावला व तक्रारदार यांचेकडे वाहन नसल्याने तक्रारदार श्रीमती चौगुले व पंच क्र.1 श्रीमती धनश्री काळे यांना शासकीय वाहनाने वाघोली पोलीस ठाणे येथे लोकसेवक पोलीस पाखरे यांची भेट घेण्याकरता 09.28 वाजता रवाना केले. त्यानंतर सदर पेट्रोल पंपावर लोकांची वर्दळ वाढल्याने आम्ही त्यांचे विरुध्द बाजूस पुण्याच्या दिशेने असलेल्या मर्सडिज बेंन्झ शोरूमच्या बाजूस असलेल्या पार्किंगमध्ये जावून थांबलो त्याबाबतची माहिती आम्ही पंच क्र.1 व शासकीय वाहनावरील चालक श्री काकडे यांना लोकेशन पाठवून दिली. चालक काकडे तक्रारदार व पंच क्र.1 यांना सोडून आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले व त्यानंतर काही वेळाने तक्रारदार श्रीमती चौगुले व पंच क्र.1 श्रीमती काळे या आम्ही थांबलेल्या ठिकाणी ऑटो रिक्षाने परत आल्या. त्यांना शासकीय वाहनात बसवून त्यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर मपोहवा 2008/काळे यांचे मदतीने काढून बंद केला. ती वेळ 10.32 वाजताची होती. त्यानंतर आम्ही पंच क्र.1 यांना ते पडताळणी कार्यवाहीकरीता रवाना झालेपासून ते परत येईपर्यतची हकिकत विचारली असता, त्यांनी पंच क्र.2 श्री मुंढे यांचे समक्ष सांगितले की, ते व तक्रारदार असे शासकीय वाहनाने रवाना होवून वाघोली पोलीस ठाणेच्या पुर्वी काही अंतरावर उतरल्या त्यानंतर पायी चालत वाघोली पोलीस ठाणे आवारात पोहचल्या असता ठाणे अंमलदार कक्षाचे बाहेर लोकसेवक पोलीस पाखरे हे त्यांची वाट पाहत उभे राहीले होते. तेच लोकसेवक पाखरे असल्याबाबत तक्रारदार यांनी पंच क्र.1 यांना डोळ्याने इशारा करून सांगितले. त्यानंतर लोकसेवक पाखरे त्या दोघींना ठाणे अंमलदार कक्षाचे बाजुस असलेल्या खोलीमध्ये घेवून गेले.

त्यावेळी चर्चे दरम्यान लोकसेवक वारंवार त्यांचे हाताचा अंगठा तर्जनीवर घासून पैशाबाबत तक्रारदार यांना विचारणा करत होते व तक्रारदार त्याबाबत बोलायला लागल्या की त्यांना तोंडाने बोलू नका इशा-याने बोला असे इशारा करून सांगत होते. म्हणून तक्रारदार यांनी किती दयायचे असे इशा-याने विचारणा केली असता लोकसेवक पाखरे यांनी काय तुमच्या हिशोबाने तस काय नाय असे तक्रारदार यांना सांगितले. त्यावेळी सदर कक्षामध्ये आलेल्या व्यक्तीकडे पाहून तक्रारदार लोकसेवक यांना बोलणार तोच काय नाय काय नाय आपलाच स्टाफ ए सगळा असे त्यांच्याकडे पाहून सांगितले. त्यानंतर तक्रारदार यांनी "तरीपण किती द्यायचे" अशी विचारणा केलेनंतर त्यावर लोकसेवक काय तुमची इच्छा असेल ते मी नाय ……. तुमचे समाधान किती झाले त्याच्यावर ए बरोबर ए का असे तक्रारदार यांना

बोलले. त्यानंतर तक्रारदार व लोकसेवक यांचेत आणखी चर्चा झाली त्यादरम्यान लोकसेवक यांनी तक्रारदार यांना वॉरंट बजावणी केली असल्याचे सांगुन वारंट बजावणीचा विटा कोर्टाचे नावे असलेला अहवाल व कागदपत्रे तक्रारदार यांना दिली व "होवुन जाईल ते पुढच झाल्यावर बघू मग काय ते आता करा तुम्हाला काय करायचं ते" असे तक्रारदार यांना लोकसेवक बोलले असता त्यावर "तक्रारदार घाई घाईत नेमकी एवढी कॅश पण नाय आणली तोवर कव्हर वगैरे घाला (तक्रारदार यांना दिलेल्या कागदपत्रांना) असे तक्रारदार बोलल्या. त्यावर लोकसेवक यांनी पुन्हा त्यांचा अंगठा तर्जणीवर घासून पैशाबाबत विचारणा केली असता तक्रारदार यांनी "चार देवु का पाच देवू" असे विचारले असता लोकसेवक पाखरे यांनी त्यांचे उजव्या हाताची पाच बोट दाखवून इशा-याने सांगितले त्यावर तक्रारदार त्यांना "पाच करू" असे विचारणा करतात त्यावर लोकसेवक "लय पळवलं लय पळवलं म्हणजे पार नको नको झाल मला त्याच्यात" असे बोलतात त्यावर रक्कम कमी करण्यासाठी तक्रारदार लोकसेवक यांना "चार पाचशे देते कारण एवढे नायत ना माझ्याकडे" असे बोलल्या असता लोकसेवक रागाने "देवुच नका ना म्हणलय मी" असे बोलतात त्यावर तक्रारदार लोकसेवक यांना "का आता म्हणले पाच हजार बर ठिक ए देते...आता कुठून काढायचे" असे बोलून त्यांच्या भावाला पैसे आणण्यास सांगते असे बोलल्या असता लोकसेवक यांनी "बोलवा पटकनी, मला जायचय मी जागलोय" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार व लोकसेवक यांचेत आणखी चर्चा होवून तक्रारदार यांनी भावाने पैसे आणले की येते असे सांगुन तेथून पंच क्र.1 व तक्रारदार परत आले अशी हकिकत पंच क्र.1 यांनी सांगितली.

त्यानंतर आम्ही तक्रारदार श्रीमती चौगुले यांना घडलेली हकिकत विचारली असता त्यांनी देखील पंच क्र.1 यांच्याप्रमाणे हकिकत सांगितली. त्यानंतर आम्ही व्हाईस रेकॉर्डरमधील ध्वनीमुद्रीत संभाषण लॅपटॉपवर कॉपी करुन फास्ट फॉरवर्ड करुन पंचासमक्ष ऐकले असता, ते तक्रारदार व पंच क्र.1 यांनी सांगितलेल्या हकिकतीप्रमाणे बरोबर असल्याची खात्री केली. एकंदरीत आज दि.25/11/2025 रोजी झालेल्या पडताळणी कार्यवाही मध्ये लोकसेवक पोलीस पाखरे यांनी तक्रारदार यांचे पतीविरुध्द विटा कोर्टाने थकीत पोटगीच्या रक्कमेची वसुलीकरीता जारी केलेल्या वॉरंटची बजावणी करुन अहवाल तक्रारदार यांचेकडे दिल्याचा मोबदला म्हणून रु.5,000/- लाचेची मागणी पंच क्र.1 श्रीमती काळे यांचे समक्ष लोकसेवक पोलीस पाखरे यांनी त्यांचे स्वत:करीता केल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे आम्ही सापळापुर्व व सापळा कारवाईचे नियोजन करून तक्रारदार श्रीमती चौगुले यांना लाच रकमेबाबत विचारणा केली असता तक्रारदार यांनी त्यांचे बचतीमधील रु.5,000/- (भारतीय चलनातील रु.500/- रुपये दराच्या 10 नोटांचे नंबर तंतोतंत जुळून आले. त्यानंतर आम्ही लाईट बंद करून लोकसेवक पोलीस हवालदार पाखरे यांचेकडून हस्तगत केलेली व पंच क्र.2 यांच्या ताब्यात असलेली लाच रक्कम व लोकसेवक पाखरे यांचे हात व कपडयाची अल्ट्राव्हायलेट दिव्याचे प्रकाशात तपासणी केली असता सदर लाच रकमेवर तसेच लोकसेवक पाखरे यांचे उजव्या तळहातास व बोटांचे पे-यास तसेच त्यांनी परिधान केलेल्या पोलीस गणवेशाचे पॅन्टचे समोरील उजव्या बाजूचे खिशाचे अग्रभागी व खिशाचे आतमध्ये अॅन्थ्रासीन पावडरची फिक्कट निळसर चकाकी दिसुन आली. त्यावेळी आम्ही तक्रारदार यांना सदर ठिकाणी बोलावून त्यांचे हात, वस्तु व परिधान केलेल्या कपडयाची अट्राव्हायोलेट दिव्याचे प्रकाशात तपासणी केली असता तक्रारदार श्रीमती चौगुले यांचे उजव्या हाताचे बोटांचे पे-यांना, त्यांचेकडील असलेल्या निळया रंगाच्या बाजुस असलेल्या चैनीच्या कप्प्याचे आतील बाजुस व परिधान केलेल्या ओढणीस अॅन्थ्रासीन पावडरची फिक्कट निळसर चकाकी दिसुन आली. त्यानंतर सदर कक्षामध्ये लाईट चालू करून उजेड केला व आम्ही लोकसेवक पोलीस पाखरे यांना त्यांचे पुर्ण नाव व पत्ता विचारला असता त्यांनी त्याचे नाव श्री परमेश्वर मानिक पाखरे वय 37 वर्षे, पद – पोलीस हवालदार, ब.नं. 7827 नेमणुक - वाघोली पोलीस स्टेशन, पुणे शहर रा. गणेशनगर, मदा मेरी सोसायटीजवळ, आव्हाळवाडी रोड, वाघोली, ता.हवेली जि. पुणे असे सांगीतले. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांच्या पती विरोधातील थकीत पोटगीच्या रक्कमेच्या वसुलीबाबत जप्ती व विक्रीच्या बजावणी केलेल्या वॉरंटची कागदपत्रे लोकसेवक पाखरे यांच्या चारचाकी वाहनामधून ताब्यात घेतले. तसेच लोकसेवक पोलीस पाखरे यांना पुढील कारवाईसाठी ताब्यात घेतले ती वेळ 13.01 वाजताची होती. उपरोक्तबाबत दोन्ही पंचासमक्ष सविस्तर पडताळणी, सापळापुर्व व सापळा पंचनामा करणेत आलेला आहे.

तरी दि. 25/11/2025 रोजी सकाळी 09.28 ते 12.09 वा दरम्यान झालेल्या पडताळणी, सापळापुर्व व सापळा कारवाई दरम्यान यातील आलोसे परमेश्वर मानिक पाखरे, वय 37 वर्षे, पद –पोलीस हवालदार, ब.न. 7827 नेमणुक - वाघोली पोलीस स्टेशन, पुणे शहर यांनी त्यांचे स्वत:करीता तक्रारदार यांचे पती विरोधात मा. दिवाणी प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, विटा न्यायालयाने जप्ती व विक्री करून पोटगीची रक्कम वसूल विषयी जारी केलेल्या वारंटची बजावणी करून त्याचा अहवाल दिल्याचे मोबदल्यात रु.5,000/- लाचेची मागणी पंचासमक्ष करून ती वाघोली पोलीस स्टेशन समोरील केसनंद रोड लगत असलेल्या बस स्टॉप जवळील, चहाच्या टपरीवर, वाघोली, पुणे येथे दोन्ही पंचासमक्ष स्वीकाली म्हणून माझी श्री परमेश्वर मानिक पाखरे वय 37 वर्षे, पद – पोलीस हवालदार,

ब.नं. 7827 नेमणुक - वाघोली पोलीस स्टेशन, पुणे शहर रा. गणेशनगर, मदा मेरी सोसायटीजवळ, आव्हाळवाडी रोड, वाघोली, ता.हवेली जि. पुणे यांचेविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 चे कलम 7 प्रमाणे कायदेशीर फिर्याद आहे.

माझा वरील जबाब संगणकावर मराठीत टंकलिखीत केला असून, तो माझे सांगणेप्रमाणे बरोबर व खरा आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):
Yuvraj Sambhaji Hande(I (Inspector)) / AGMH31713 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Yuvraj Sambhaji Hande
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): AGMH31713

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**